**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना आढावा बैठक**
**दिनांक १२.१०.२००७**
**जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री संजीव जयस्वाल | जि.का.स. मग्रारोहयो तथा जिल्हाधिकारी, औ,बाद |
| २ | श्रीमती रिता मेत्रेवार | उप जि.का.स. उप जिल्हाधिकारी,औ,बाद |
| ३ | श्री व्ही. व्ही. गुजर | अति. म.का.अ. जि.प. औरंगाबाद. |
| ४ | डॉ. भारत कदम | उपविभागीय अधिकारी, सिल्लोड |
| ५ | श्री अण्णासाहेब शिंदे | उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद |
| ६ | श्री पी. एल. सोरमारे | उपविभागीय अधिकारी, वैजापुर |
| ७ | श्रीमती अपर्णा सोमाणी | कार्यक्रम अधिकारी, औरंगाबाद |
| ८ | श्री आर. पी. मिराशे | कार्यक्रम अधिकारी, वैजापुर |
| ९ | श्रीमती एच.पी.वांगीकर | कार्यक्रम अधिकारी, फुलंब्री |
| १० | सौ. सविता चौधर | कार्यक्रम अधिकारी, गंगापुर |
| ११ | श्रीमती के. पी. कांबळे | सह कार्यक्रम अधिकारी, फुलंब्री, सिल्लोड |
| १२ | श्री एस. एल. सुर्यवंशी | सह कार्यक्रम अधिकारी, वैजापुर |
| १३ | श्री अे. पी. बोराडे | सह कार्यक्रम अधिकारी, खुलताबाद |
| १४ | श्री मनोज चौधर | सह कार्यक्रम अधिकारी, औरंगाबाद |
| १५ | श्री डी. एस. मनोरे | नायब तहसिलदार, कन्नड |
| १६ | श्री आ. पां. काळुखे | कार्यकारी अभियंता (सिंचन) जि.प. औरंगाबाद. |
| १७ | श्री अनिल एम. रोकडे | वरिष्ठ सहा. पंचायत समिती, औरंगाबाद |
| १८ | श्री योगेश राजहंस | सिनर्जीज सोलुशन, औरंगाबाद |
| १९ | श्री एच.पी.सनान्से | अे. पी. ओ. सिल्लोड |
| २० | श्री ढाकरे डी. एस. | कनिष्ठ सहा. पंचायत समिती, गंगापुर |
| २१ | श्री व्ही. पी. बोडखे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती,सिल्लोड |
| २२ | श्री डी. ए. जायभाये | विस्तार अधिकारी, पंचायत समिती,सिल्लोड |
| २३ | श्री ए.पी.पाटील | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री |
| २४ | श्री सी. व्ही इंगोले | ग्रामसेवक, पंचायत समिती, फुलंब्री |
| २५ | श्री दापके जि. के | अे. पी. ओ. कन्नड |
| २६ | श्री चाटे डी. ई. | अे. पी. ओ. जि.प. औरंगाबाद |
| २७ | श्री बी. डी. दुरपडे | कनिष्ठ अभियंता, पं.स. पैठण |
| २८ | श्री शिंदे पी. के. | ग्रामसेवक पं.स.पैठण |
| २९ | श्री देशपांडे एन. के. | प्र. तहसिलदार, सोयगाव |
| ३० | श्री पी. के. लाड | नायब तहसिलदार, खुलताबाद. |
| ३१ | श्री एस. आर. मालपाणी | कनिष्ठ अभियंता, जि.अ.का.औरंगाबाद. |
| ३२ | श्री आर. आर. उत्तरवार | वरिष्ठ सहाय्यक, जि.अ.का. औरंगाबाद. |
| ३३ | श्री एस. बी. दांडगे | अे. पी. ओ. जि.अ.का. औरंगाबाद. |

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - २००५ अन्वये**
**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**
**आढावा बैठक दिनांक १२/१०/२००७ चा कार्यवृत्तांत.**

आज दिनांक :- १२/१०/२००७ रोजी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आढाव्या बाबत जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मग्रारोहयो तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली सर्व कार्यक्रम अधिकारी, सहकार्यक्रम अधिकारी, यांची बैठक पार पडली. सोबत उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांची यादी जोडलेली आहे.

सर्व प्रथम मागील बैठक दिनांक ०७/०९/२००७ रोजीच्या बैठकीत आदेशित केलेल्या बाब निहाय अनुपालनाची चर्चा करण्यात आली.

या आढावा दरम्यान असे निदर्शनास आले की, बैठकीत दिलेल्या सुचना / आदेश तसेच गट विकास अधिकारी, तहसिलदार यांचे कडून सादर करावयाची माहिती याबाबत मागील महिना भरात विहित कालावधीत अनुपालन करण्यात आलेले नाही. मा. जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.

दिनांक १२.१०.२००७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीस पुर्व परवानगी शिवाय गैर हजर असणा-या अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्या विषयी मा. जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेले आहे. यामध्ये गट विकास अधिकारी, पैठण यांची अनुपस्थिती आढळुन आलेली आहे. आणि या बाबत अति मु का अ अथवा इतर सक्षम अधिका-याने सभे मध्ये खुलासा केलेला नाही.

सभेसाठी केवळ तहसिलदार आणि गट विकास अधिकारी यांना बोलाविण्यात आलेले असतांना देखील असे निदर्शनांस आले आहे की, कनिष्ठ लिपीक, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी या सारख्या एक पेक्षा अधिक कर्मचारी संबधित अधिका-यां सोबत उपस्थित असल्याचे निदर्शनांस आलेले आहे. या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले आहे की, यापुढे केवळ तहसिलदार आणि गट विकास अधिकारी अथवा आदेशित केलेल्या अधिका-याने सभेस उपस्थित रहावयाचे आहे. आणि अपरिहार्य कारणा शिवाय प्रतिनिधी पाठवु नये तसेच असे प्रतिनिधी पाठवितांना त्या बाबत त्यांच्याकडे अधिकृत पत्र देऊन शक्यतो पुर्व परवानगी घ्यावी. यापुढे कोणत्याही परिस्थितीत वरिल प्रमाणे कर्मचा-यांना सभागृहात बसण्याची परवानगी राहणार नाही.

विषय सुची नुसार विषयाची सुरुवात करण्यात आली असता सर्व प्रथम पत्रात नमुद केल्या प्रमाणे विषय निहाय माहिती एकाही गटाने रोजगार हमी शाखेस १०.१०.२००७ पर्यंत न दिल्यामुळे संकलीत अहवाल मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करता आला नाही. त्यामुळे परिणाम कारक आढावा घेता आलेला नाही. यापुढे तरी किमान बैठकीच्या दोन दिवस अगोदर अशी माहिती आदेशित केल्या प्रमाणे या विभागास देण्यात यावी.

मग्रारोहयो अंतर्गत सन २००८-०९ चा वार्षीक कृती आराखडा विहीत कालावधीत सर्व स्तरावरच्या मान्यतेसह तयार करावयाचा आहे. या अनुषंगाने दिनांक १५.१०.२००७ पर्यंत तालुका स्तरावर ग्रामपंचायत आणि इतर यंत्रणा यांचा आराखडा ग्रामपंचायत निहाय करुन संकलीत आराखडयास पंचायत समितीची मान्यता घ्यावयाची आहे. या अनुषंगाने आढावा घेण्यात आला असता सर्व गटांनी

असे आराखडे तयार करण्यात आलेले असुन त्यास पंचायत समितीची मान्यता घेण्यात आली आहे / घेण्यात येत आहे असे सभागृहात सांगितले. या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी परत एकदा आराखडया विषयी विस्तृत मार्गदर्शन करुन आराखडे ग्रामसभेच्या मान्यतेने आणि परिपुर्ण , पुरेसे असावेत असे सर्वांना सांगितले. तसेच तयार करण्यात आलेल्या आराखडया शिवाय अजुनही कामे सुचविल्या ती देखील कामे पुरक आराखडा म्हणुन समावेश करता येईल असे देखील जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. त्याच प्रमाणे जिल्हा स्तरावर असे आराखडे सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी संकलीत करुन विहीत कालावधीत जिल्हा परिषदेची मान्यता घेण्या विषयी मार्गदर्शन केलेले आहे. यासाठी शासनाने दिलेले नियोजन प्रक्रीया आणि वेळा पत्रक याचे तंतोतंत पालन करण्या विषयी जिल्हाधिकारी यांनी पुन्हा एकदा सर्वांना सांगितले.

सभे मध्ये चर्चा करतांना असे निदर्शनांस आले आहे की, मजुरांचे छायाचित्रे काढण्याचे काम अदयापही ब-याच प्रमाणात प्रलंबीत आहे. यासाठी जिल्हा स्तरावरुन नियुक्त केलेल्या मुव्ही व्हिडीओ, औरंगाबाद या बाहयस्थ संस्थेचा कराराची मुदत देखील संपलेली आहे. अशा परिस्थितीत या संस्थेस जिल्हा स्तरावरुन सतत पाठ पुरावा करुन उर्वरीत छायाचित्रे काढुन देण्या साठी कळविण्यात आलेले आहे आणि त्या प्रमाणे ही संस्था देखील तयार आहे. मात्र केवळ गटा कडुन अगाऊ स्वरुपात परिपुर्ण नियोजन आणि समन्वयाचा अभाव यामुळे या बाबत अदयापही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. या बाबत जिल्हाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली.

तसेच उर्वरीत छायाचित्रे किमान १५ दिवस अगोदर नियोजन या कार्यालयास कळवुन त्या प्रमाणे पुढील नियोजन करुन तालुक्या मध्ये उर्वरीत छायाचित्रे काढुन घेण्यात यावी असे जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले. या उपरही ज्या मजुराचे छायाचित्र काढुन झालेले नसेल अशा बाबतीत सर्व स्तरावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल या बाबत देखील जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केलेले आहे.

केंद्र आणि राज्य शासनाने योजने अंतर्गत झालेल्या कामांची हजेरी पत्रकांची चावडी वाचन करण्या विषयी वारंवार पाठपुरावा केलेला आहे. त्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरुन वारंवार सुचना दिलेल्या आहेत. तथापी एकाही गटा कडुन या बाबत कार्यवाही होऊन अनुपालन सादर केलेले नाही. सन २००७-०८ वर्षा मध्ये झालेल्या कामांची हजेरी पत्रके माहे सप्टेंबर २००७ अखेरपर्यंतच्या वाचन करुन विहित केलेल्या नमुन्यात काम निहाय अनुपालन देण्या विषयी कळविलेले आहे. त्याच प्रमाणे या चावडी वाचना दरम्यान आढळुन आलेल्या अनियमितते बाबत शक्य असलेले अभिलेख जसे काम मागणी अर्ज, निर्देश पत्र, मजुराचे रोजगार पत्रक क्रमांक हजेरी पत्रकावर , मजुरा कडील रोजगार पत्रकावर कामाचे अभिलेख , दिलेली मजुरी याबाबी तात्काळ करुन घेण्यात याव्यात आणि हजेरी पत्रक निहाय , काम निहाय, आर्थिक गैरव्यवहारा बाबत संबधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर दोषारोप पत्र ठेऊन , वसुलपात्र रक्कम निश्चित करुन , वेळ प्रसंगी गुन्हे दाखल करुन पुढील कार्यवाही संबधित तहसिलदार यांनी करावी असे देखील जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच सन २००६-०७ वर्षात झालेल्या कामां पैकी जि हजेरी पत्रके दिनांक १.४.२००६ नंतर ची आहे अशा सर्व हजेरी पत्रकाचे देखील वरिल प्रमाणे कार्यवाही करुन दिनांक १.१०.०७ पर्यत अहवाल देण्या विषयी कळविलेले आहे तथापी एकाही गटाने अशी कार्यवाही केलेली नाही. या बाबत जिल्हाधिकारी यांनी नाराजी व्यक्त

करुन ऑक्टोंबर २००७ अखेर पर्यंत अहवाल सादर करण्या विषयी आदेशित केले आहेत. त्याच प्रमाणे चावडी वाचना मध्ये काही ठिकाणी केवळ ग्रामपंचायत कामांचेच चावडी वाचन करण्यात आल्याचे निदर्शनांस आले आहे. या बाबत जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे की, या अनुषंगाने जिल्हास्तरावरुन दिलेल्या निर्देशात ग्रामपंचायती अंतर्गत झालेल्या सर्व कामांची म्हणजेच ग्रामपंचायत अथवा इतर यंत्रणा यांची कामांची हजेरी पत्रके वाचन करावयाचे असतांना देखील जिल्हास्तरावरील पत्रांचा सोयीस्कर विपर्यास्त अर्थ काढण्यात येऊ नये याबाबत सक्त सुचना देऊन वरिल प्रमाणे कार्यवाही करण्या विषयी संबधितास आदेश केले आहे.

योजने अंतर्गत वेळोवेळी झालेल्या कामाच्या तपासण्या सर्व स्तरावर करण्यात याव्यात यासाठी शासनाने निर्गमीत केलेल्या इष्टांका प्रमाणे तपासण्या करण्या विषयी जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले. योजनेच्या अनुषंगाने वर्तमान पत्रात येणा-या बातम्यां बाबत देखील संबधित गट विकास अधिकारी आणि तहसिलदार यांनी बातमीच्या अनुषंगाने तात्काळ स्वतःहुन खुलासा / अभिप्राय सादर करणे अनिवार्य आणि अपेक्षित असतांना देखील असे एकाही गटा कडुन झालेले दिसुन आलेले नाही. यापुढे तरी किमान अशा बातम्याच्या अनुषंगाने तात्काळ खुलासा / अभिप्राय मुळ बातमीच्या कात्रणासह जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे. या बाबत पुन्हा आदेश करण्यात येणार नाही.

योजने अंतर्गत झालेल्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दर तिन महिण्याला सामाजिक लेखा परिक्षण आणि सहा महिण्यातुन किमान एकदा सामाजिक लेखा परिक्षण मंच आयोजित करावयाची आहेत या अनुषंगाने केंद्र शासनाने निर्गमीत केलेले पत्र सभागृहात वाचुन दाखविण्यात आले त्याच प्रमाणे या पत्रात नमुद केल्या प्रमाणे ग्रामपंचायत निहाय होणा-या सामाजिक लेखा परिक्षण / मंच या साठी देण्यात आलेल्या प्रपत्राचे स्थानिक भाषेत तयार केलेले प्रपत्रे जिल्हयातील प्रत्येक ग्रामपंचायती साठी प्रत्येकी दोन या प्रमाणे गट निहाय वितरित करण्यात येऊन याच प्रपत्रात माहिती तसेच सामाजिक लेखा परिक्षण / मंच यासाठी उपस्थितांची यादी / कार्यवृत्तांताची प्रत देण्या बाबत जिल्हाधिकारी यांनी मार्गदर्शन करुन आदेशित केले आहे. त्याच प्रमाणे केंद्र शासनाने आदेशित केल्या प्रमाणे सामाजिक लेखा परिक्षण / मंच याचे वार्षीक नियोजना बाबत खालील प्रमाणे ठरविण्यात आले.

| अ.क्र. | अंमलबजावणी कालावधी | सालेप / मंच घोषित करणे | सालेप / मंच आयोजित करणे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रील ते जुन | जुन | जुलै | सालेप |
| २ | एप्रील ते सप्टेंबर | सप्टेंबर | ऑक्टोंबर | सालेप मंच |
| ३ | ऑक्टोंबर ते डिसेंबर | डिसेंबर | जानेवारी | सालेप |
| ४ | ऑक्टोंबर ते मार्च | मार्च | एप्रील | सालेप मंच |

वरिल प्रमाणे कार्यवाही ही सतत आणि निरंतर करावयाची आहे त्यामुळे यापुढे पुर्वघोषित तारीख कळविणे इत्यादी कार्यवाही नियमितपणे वेळोवेळी करुन वरिल प्रमाणे सालेप / मंच आयोजित करण्या विषयी कळविलेले आहे.

जिल्हयामध्ये ऑक्टोंबर २००७ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सालेप मंच याचे ग्रामपंचायत निहाय अभिलेख जतन करावयाचे आहे यासाठी प्रत्येक ग्रामसभेचे

चार रंगीत छायाचित्रे काढण्यात यावी आणि शक्य त्या ठिकाणी किमान १५ मिनीटाचे चलचित्रीकरण करण्यात यावे. असे करतांना तालुक्यासाठी जास्तीत जास्त रुपये १००००/- पेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता संबधित तहसिलदार यांनी घेऊन नियोजन करुन अनुपालन सादर करावे. तसेच या सालेप मंच साठी स्थानिक पातळीवरील प्रायोजक उपलब्ध झाल्यास त्याचे देखील सहाय घेण्यात यावे.

तसेच या सामाजीक लेखा परिक्षण मंच साठी सर्व संबधित अधिकारी / कर्मचारी यांनी ग्रामसभा निहाय उपस्थित राहुन सर्व अभिलेख सालेप मंच साठी उपलब्ध करुन दयावयाचे आहे. यामध्ये जो कोणी अधिकारी / कर्मचारी अनुपस्थित राहतील आणि अभिलेख उपलब्ध करुन देणार नाही अशा अधिकारी / कर्मचारी यांना तात्काळ निलंबीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. असेही सभागृहात जिल्हाधिका-यांनी आदेशित केले.

सामाजिक लेखा परिक्षण मंच साठी ग्रामसभा निहाय अशासकीय संस्था यांची मदत घेता येईल किंवा कसे आणि या अनुषंगाने काय कार्यवाही / नियोजन करता येईल याबाबत सभागृहात चर्चा करुन स्थानिक पातळीवर उचित कार्यवाही करण्या विषयी आदेशित करण्यात आले.

योजने अंतर्गत अदा करण्यात आलेल्या हजेरीपत्रकाच्या नोंदी योजनेच्या संकेत स्थळावर सादर करावयाच्या आहेत यासाठी सन २००७-०८ वर्षातील उर्वरीत हजेरीपत्रकाच्या नोंदी या पुढे तालुका स्तरावर करावयाच्या असुन यासर्व नोंदी या महिना अखेर पर्यंत अदययावत करण्यात याव्यात आणि सन २००६-०७ वर्षातील हजेरी पत्रकाच्या नोंदी तालुका स्तरावर ऑफ लाईन करण्यात याव्यात. आणि या सर्व नोंदी ऑक्टोंबर २००७ अखेर पर्यंत पुर्ण करण्यात याव्यात असेही जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले आहे. ऑफ लाईन नोंदी करण्यासाठी तालुका स्तरावर एन आय सी कडुन सॉफटवेअर देण्यात आलेले असुन मंगल फॉन्ट मध्ये हे काम करावयाचे आहे. यासाठी देण्यात आलेले सॉफटवेअर तालुका स्तरावर आज मितीस उपलब्ध नसल्यास याबाबत डि आय ओ एन आय सी यांच्याशी थेट संपर्क साधुन उचित कार्यवाही करुन अनुपालनासह नियुक्त केलेले काम विहित कालावधीत करुन घेण्या विषयी जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले.

त्याच प्रमाणे तालुका स्तरावरील डायलअप जोडणीचे देयक जिल्हा स्तरावर सादर करुन अदायगी करण्यासाठी विलंब लागण्याची शक्यता लक्षात घेता यापुढे अशी देयके विहित मर्यादेत आहेत याची खात्री करुन तहसिलदार यांनी गट विकास अधिकारी यांच्याकडे यापुर्वीच दिलेल्या आकस्मिक खर्च निधीतुन भागवावीत आणि केलेल्या खर्चाचा अहवाल दर महा या कार्यालयास सादर करावा. तसेच तहसिलदार यांना योजने अंतर्गत लेखन सामग्रीची आवश्यकता असल्यास अनिवार्य आणि अनुज्ञेय लेखन सामग्री तहसिलदार यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे वर्ग केलेल्या आकस्मिक खर्च निधीतुन घेण्यास हरकत नाही मात्र असे करतांना सर्व लेखा विषयक बाबीची पुर्तता करण्यात यावी. आणि केलेल्या खर्चाचा विस्तृत हिशोब जिल्हाधिकारी कार्यालयास दरमहा नियमितपणे सादर करावा. त्याच प्रमाणे योजने अंतर्गत कामांची अंदाजपत्रके पंचायत समिती मधील बाहयस्थ यंत्रणेचे संगणक उपयोगात आणुन ग्रामपंचायत आणि इतर यंत्रणा यांनी पंचायत समिती मध्ये करावी. असेही जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले आहे.

योजने अंतर्गत आयोजित केलेल्या धडक मोहिम प्रशिक्षण कार्यक्रमाचा खर्च आणि ४ एप्रील २००७ रोजीच्या प्रशिक्षणाचा खर्च अदयापही कळविलेला नाही तसेच

संवर्ग निहाय, लिंग निहाय, अधिकारी / पदाधिकारी यांची उपस्थिती कळविलेली नाही या बाबत जिल्हाधिकारी यांनी तिव्र नाराजी व्यक्त करुन दिनांक १५.१०.२००७ पर्यंत असा खर्च देण्या विषयी सर्वांना आदेशित केले आहे. त्याच प्रमाणे धडक मोहिम कार्यक्रमा अंतर्गत उपस्थित प्रशिक्षणार्थींच्या रुपये ४०/- इतका सर्व मिळुन खर्च अनुज्ञेय करुन कमाल खर्च त्याच प्रमाणात मंजुर करण्यात येईल असे देखील जिल्हाधिकारी यांनी सभागृहात आदेशित केले तसेच उपस्थिती ही जिल्हा स्तरावरुन शासनांस उपलब्ध अभिलेख्याच्या आधारे कळविण्यात येत असुन या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित तहसिलदार आणि गट विकास अधिकारी यांची राहील याची देखील सर्वांना जाणिव करुन देण्यात आलेली आहे.

योजने अंतर्गत झालेल्या कामांची १०० टक्के तपासणी करण्यासाठी सन २००७-०८ वर्षातील माहे सप्टेंबर अखेर पर्यंत झालेल्या कामांची काम निहाय तपासणी अधिकारी यांची नियुक्ती करुन पडताळणी अहवाल घेण्या विषयी जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले आहे. या तपासणी मध्ये तपासणी अधिकारी यांनी एक तांत्रीक आणि एक प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी यांना चमुत समाविष्ठ करुन काम निहाय तपासणी अहवाल सादर करावयाचा आहे. तपासणी साठीचे विस्तृत नियोजन रोजगार हमी शाखेने दिनांक १५.१०.२००७ पर्यंत मान्य करुन घेऊन सर्व संबधितांना वितरित करावयाच्या आहेत. आणि असे अहवाल माहे ऑक्टोंबर अखेर पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सर्व तपासणी अधिका-यांनी विहित नमुन्यात सादर करावयाचे आहेत. त्याच प्रमाणे सन २००६-०७ वर्षातील कामांची १०० टक्के तपासणी देखील नोव्हेंबर आणि डिसेंबर महिण्या मध्ये आयोजित करावयाचे असुन यासाठी देखील वरिल प्रमाणे नियोजन आणि कार्यवाही करण्या विषयी जिल्हाधिकारी यांनी आदेशित केले आहे.

योजने अंतर्गत जिल्हा स्तरावर कमालीचा प्रयत्न करुनही पाहिजे त्या प्रमाणात तालुका स्तरावरुन प्रतिसाद मिळत नाही या बाबत जिल्हाधिकारी यांनी खंत व्यक्त केली आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या पिशोर ता. कन्नड येथील दिनांक ११.१०.२००७ रोजीच्या क्षेत्रीय भेटीचा उल्लेख करुन आदेशित केले आहे की, ज्या ठिकाणी मजुरांची मागणी जास्त प्रमाणात आणि सतत आहे अशा मोठया ग्रामपंचायतींना योजनेचे कामे करण्यासाठी तांत्रीक सहाय म्हणुन स्थानिक पातळीवरील योग्य पात्रतेचा अभियंता अथवा कृषी अधिकारी यांची आवश्यकता असल्यास अशा ग्रामपंचायती या तांत्रीक संवर्गाची योजनेच्या अंमलबजावणीसाठी मदत घेऊ शकेल व असे करतांना त्या तांत्रीक संवर्गास योजने अंतर्गत ग्रामपंचायती मार्फत झालेल्या कामाच्या १.२३ टक्के दराने मानधन प्रत्येक हजेरी पत्रकाच्या अदायगी सोबत ( त्यात कुशल आणि अकुशल दोन्ही कामासाठी ) देण्यात येईल मात्र या तांत्रीक सहायकास योजने अंतर्गत जिल्हा स्तरावरुन बाहयस्थ यंत्रणेकडुन उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या तांत्रीक सहायकाने जी कामे पार पाडावयाची आहेत ती सर्व कामे पार पाडावी लागणार आहेत आणि असे करतांना या तांत्रीक सहायका मुळे एखादी अनियमितता घडल्यास त्या बाबतचे दायीत्व साहजिकच संबधित ग्रामपंचायतीचे राहील असे देखील जिल्हाधिकारी यांनी सभागृहात स्पष्ट केलेले आहे. ग्रामपंचायती ने या प्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्या पुर्वी संबधित कार्यक्रम अधिकारी यांचेकडे रितसर परिपूर्ण प्रस्ताव सादर करुन त्यांचेकडुन मान्यता घ्यावी. आणि संबधित कार्यक्रम अधिकारी यांनी याबाबत जिल्हा कार्यकम समन्वयक यांना अवगत करावे.

योजने अंतर्गत सन २००६-०७ आणि २००७-०८ वर्षात झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र वारंवार आदेशित करुनही संबधित गट विकास अधिकारी आणि तहसिलदार यांनी अदयापही सादर केलेले नाही याबाबत जिल्हाधिकारी यांनी तिव्र नाराजी व्यक्त करुन दिनांक १५.१०.२००७ पर्यंत अभिलेखाच्या आधारावर उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्या विषयी सक्त सुचना दिलेल्या आहेत.

वरिल प्रमाणे योजनेच्या अनुषंगाने विषय सुची प्रमाणे आढावा घेण्यात आला. आणि योजनेची परिणामकारक अंमलबजावणी जिल्हयामध्ये करावी असे अवाहन करुन जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

**सोबत :- उपस्थितांची यादी.**

**जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो**
**तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद. करिता.**

**स्थळप्रतीवर जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो**
**तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांची स्वाक्षरी असे.**

प्रतिलीपी :-

१. मा. ग्रामीण रोजगार हमी आयुक्त, मग्रारोहयो तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
२. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मग्रारोहयो तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४. -------------------------------------------- सर्व यंत्रणा प्रमुख जिल्हा औरंगाबाद
५. उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद, वैजापुर, सिल्लोड यांना माहितीस्तव.
६. कार्यक्रम अधिकारी, मग्रारोहयो तथा तहसिलदार --------------------- सर्व यांना माहितीस्तव.
७. सह गट कार्यक्रम अधिकारी, मग्रारोहयो तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ----------------------------- सर्व यांना माहितीस्तव.
८. निवड नस्ती.

**जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो**
**तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद. करिता.**

**स्थळप्रतीवर जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो**
**तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांची स्वाक्षरी असे.**